# संतांची परादृष्टी

१ ऑक्टोबर, २०१८

आत्मीय वाचकांनो,

एक झाड आहे, जे सामान्यतः पूर्व अमेरिकेच्या व कॅनडाच्या काही प्रदेशांमध्ये आढळते. त्याची पाने हृदयाकृती असतात आणि शरद ऋतूच्या आगमनाबरोबर ती पहिल्यांदा लाल, मग केशरी आणि त्यानंतर सोनेरी पिवळा रंग धारण करतात. या झाडाच्या जवळून जाताना मी नेहमी स्मितहास्य करते. चिमुकल्या हृदयांच्या धारा त्याच्या शाखांवरून खाली ओघळतात, तो जणू काही रंगांचा धबधबा असतो, जो त्या ऋतूपर्वात आपले स्वागत करत असतो.

तरीही, मला याहूनही जास्त मंत्रमुग्ध करणारे जे असते, ते आहे एखादे निराधार पान जे झाडावरून गळून दूर जाऊन पडलेले असते. ते तुमच्या परिचयाचे आहे. ते गवतात दडलेले असते किंवा पदपथावर पडलेले असते, संकुचित होऊन अगदी साधेपणाने. त्याचा चेहरा थोडा डागाळलेला असतो आणि त्याच्या कडा आतल्या बाजूला हलकेच वळत असतात. तथापि, तत्त्वतः ते सदैव तेच राहते जे ते होते — एक हृदय.

या सामान्य आणि त्याचबरोबर असामान्य दिसणाऱ्या घटनेवरून आपल्याला अनेक कथानके रचता येवू शकतात. ती कथा असू शकते कालातीत असे अस्तित्व असण्याची, त्या अस्तित्वाची जे प्राकृतिक तत्त्वांच्या नियमांचा आदरही करते आणि त्या नियमांच्या पलीकडेही जाते, एखाद्या वस्तूतील ते अविनाशी चैतन्य जे या जीवनाला खरा अर्थ प्रदान करते. अशा प्रकारे, ती कथा कृपेशी निगडीत असू शकते, की कशा प्रकारे ती कृपा सर्व गोष्टींना आच्छादित करते, की कशा प्रकारे कृपा कदाचित अगदी अनपेक्षित वाटणाऱ्या स्थानीदेखील उपस्थित असते.

ऑक्टोबर, हा बाबांचा महिना आहे. हा तो काळ आहे जेव्हा आपण बाबांच्या महासमाधीची वर्षगाठ साजरी करतो, तो काळ, जेव्हा त्यांनी आपल्या भौतिक देहाचा त्याग केला आणि ते त्या महान, व्यापक चितीत पूर्णपणे विलीन झाले जी प्रत्येक वनस्पतीत, प्राणिमात्रात आणि अचेतन कणातदेखील स्पंदित

आहे. बाबांनी २ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेला महासमाधी घेतली. या वर्षी, बाबांच्या महासमाधीची वर्षगाठ चांद्रतिथीनुसार २४ ऑक्टोबरला आहे.

सिद्धयोग मार्गावरील साधकांसाठी ही एक परंपराच बनली आहे की, या समयी आपण आपल्या सभोवताली असणाऱ्या अनेक गोष्टींची आवर्जून दखल घेतो ज्या आपल्याला कृपेचे — बाबांच्या कृपेचे स्मरण करवून देतात. त्यांना 'बाबांचे संकेत,' असे म्हटले जाते. हे संकेत ग्रहण करून, त्यांतील सुसंगतीला जाणले असता, बाबा आपल्यातच आहेत असा अनुभव आपल्याला येतो. आपण हे जाणतो, की ते इथे आहेत.

आणि या जाणीवेसह आपण निश्चित काही करू शकतो. हेच ते आहे जे कदाचित सर्वाधिक महत्त्वाचे आहे. आपण जर ठरवले, तर आपण असे मानू शकतो की जे संकेत आपल्याला मिळाले आहेत ते आपल्या साधनेसाठी प्रोत्साहनकारी आहेत, आपण असे मानू शकतो की, मिळालेले हे स्मरणसंकेत गुरूंच्या शिकवणींचा अभ्यास करत राहण्यासाठी आहेत, याची सार्थ जाणीव ठेवत की ध्येय साध्य करण्यासाठीच्या आपल्या प्रयत्नांना अमूल्य असा आधार आहे. आणि आपण जेव्हा असे करतो, यापेक्षा, आपण जेव्हा अशी प्रत्यक्ष कृती करतो, तेव्हा काहीतरी आश्चर्यकारक घडते. आपले कृपेविषयीचे आकलन विस्तृत होते आणि रूपांतरित होते.

गुरुमाईंनी अनेकदा याविषयी सांगितले आहे की बाबांना नीलबिंदूबद्दल शिकवणे कसे आवडत असे. तो नीलबिंदू, जो साधनेचे अत्युच्च ध्येय आहे आणि त्या तिळाएवढ्या निळ्या रंगाच्या बिंदूमध्ये संपूर्ण ब्रह्मांड आणि त्याच्याशी असलेली आपली एकात्मकता संक्षिप्तपणे सामावलेली आहे. गुरुमाईंनी म्हटले आहे की, नीलबिंदू हा बाबांचा सर्वात प्रिय अनुभव होता. ती एक सुंदर प्रतिमा आहे आपल्या जाणीवेत ठेवण्यासाठी व तिच्यावर मननचिंतन करण्यासाठी, विशेषतः या वर्षात, जेव्हा गुरुमाईंचा संदेश 'सत्संग अर्थात् सत्याची संगती' हा आहे.

ध्यानामध्ये, आपल्या स्वप्नांमध्ये किंवा आपल्या जागृतावस्थेत नीलबिंदूचे दर्शन करणे म्हणजे सत्संगाचा अनुभव घेणे होय. याचा खरा अर्थ आहे आपल्या खऱ्या आत्म्याच्या संपर्कात राहणे आणि त्या आत्म्याला आपल्या सभोवतालच्या सर्व वस्तूमात्रात पाहणे. याचा अर्थ आहे बाबांची शिकवण 'परस्पर देवो भव'चा अर्थ समजून घेणे, केवळ बौद्धिक पातळीवरच नाही तर स्वयंस्फूर्त बोधाद्वारे, अंतःप्रज्ञेद्वारे आणि आपल्या अंगप्रत्यंगात, आपल्या रोमारोमांत याचा अनुभव घेणे, त्या स्थानीही अनुभव करणे जिथे आपला आत्मा निवास करतो.

बाबा कशा प्रकारे या जगताकडे पाहात असत या संदर्भातील त्यांची वर्णने ऐकणे आणि वाचणे मला कायमच प्रिय आहे. बाबा म्हणत की, तो नीलबिंदूचे आहे की ज्याचे दर्शन ते सर्वप्रथम घेत असत जेव्हा एखादी व्यक्ती त्यांच्यासमोर येत असे, प्रत्येक वस्तू किंवा व्यक्ती चमचमत्या नीलप्रकाशाने बनलेली असे. अशा परादृष्टीचा केवळ विचार हादेखील मनाला आदराने, श्रद्धेने आणि विस्मयाने भारावून टाकतो. अशी परादृष्टी असू शकते आणि तीच या जगाचे खरे वास्तव आहे, या तथ्याची केवळ कल्पनादेखील कुतुहल, आश्चर्य आणि कृतज्ञता हे भाव जागवते. ही आहे संतांची परादृष्टी, आणि हे ते वास्तव आहे ज्याचा अनुभव घेण्यासाठी ते आपल्याला आमंत्रित करतात.

म्हणून, या ऑक्टोबर महिन्यात तुम्ही सत्संगाचा अभ्यास सुरू ठेवत असतानाच, बाबांचे आणि त्यांनी काय शिकवले याचे स्मरण करा. त्यांनी साधकांमध्ये जागृत केलेल्या  परादृष्टीचे अर्थात् त्या नीलबिंदूचे चिंतन करा. पुन्हापुन्हा विराम घ्या, पुन्हापुन्हा स्वतःशी जोडले जा, तुमच्या अंतरातील शोधाची प्रखरता वाढेल, केवळ या अभिलाषेपोटी नव्हे की डोळ्यांच्या पाठीमागील आतिषबाजी तुम्हाला पाहायची आहे, तर तुमचा हा खरा ध्यास आहे, या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा, जाणून घेण्याचा आणि समजून घेण्याचा की, 'मी कोण आहे?'

***

*तुम्ही कोण आहात? मी कोण आहे? मी कुठुन आलो आहे?*[1]

हे प्रश्न महान ऋषी आदि शंकराचार्य यांनी 'चर्पटपञ्जरिका' या स्तोत्रामध्ये उपस्थित केले आहेत. हे संस्कृत भाषेतील एक स्तोत्र आहे जे वैदिक तत्त्वज्ञानावर आधारलेले आहे आणि ज्याचे पठण सिद्धयोग आश्रमांमध्ये केले जाते. या वर्षाच्या त्यांच्या संदेश प्रवचनात गुरुमाईंनी आदि शंकराचार्यांचा उल्लेख केला होता; भारताच्या संतपरंपरेतील ते एक संत होते, ज्यांनी शतकांपूर्वी लोकांना सत्संगांमध्ये एकत्र आणले.

आदि शंकराचार्यांनी इथे उपस्थित केलेले जे प्रश्न आपण पाहतो, ते तेच प्रश्न आहेत जे अनंत काळापासून संत आणि ऋषीमुनी विचारत आले आहेत. ते युगांपूर्वीही समयोचित होते आणि आजही ते प्रतिध्वनित होतात, कारण ते असा एक ध्यास स्पष्टपणे व्यक्त करतात जो अति गहन आहे, जो अंगभूत आहे, तो मानवाच्या अस्तित्वाचा आधार आहे. इतिहासात सर्वत्र लोकांनी या प्रश्नांचा शोध विभिन्न

मार्गांनी घेतला आणि त्यांचा शोध असाधारण सर्जनशीलतेच्या अभिव्यक्तींमध्ये आणि अतिशय ठोस कृतींमध्ये परिणत झाला ज्या शांती आणि सौहार्द यांना वृद्धिंगत करतात.

सिद्धयोग मार्गावरील आपण सर्वजण अतिशय भाग्यवान आहोत, कारण अपेक्षित ध्येय आणि अस्तित्व यांकडे जाणाऱ्या अतिशय मूलभूत प्रवासात आपल्याला श्रीगुरूंची कृपा आणि त्यांच्या शिकवणी यांचे मार्गदर्शन लाभले आहे. मी कोण आहे? — अनंत काळापासून असलेला हा समृद्ध, गहन प्रश्न — हेच ते शीर्षक आहे जे गुरुमाईंनी या वर्षी बाबा मुक्तानंदांच्या महासमाधीप्रित्यर्थ आयोजित सिद्धयोग ध्यानशिबीराला दिले आहे.

शक्तिपात ध्यानशिबीराच्या महत्त्वपूर्णतेचे वर्णन शब्दात करणे कठिण आहे. ध्यानशिबीराच्या दरम्यान श्रीगुरू शक्तिपात दीक्षा प्रदान करतात, दिव्य अनुग्रह, ती जागृती, जिच्यामुळे आध्यात्मिक मार्गावरील आपल्या साधनेचा आरंभ होतो. ४० वर्षांपूर्वी सन १९७४मध्ये बाबांनी शक्तिपात ध्यानशिबीराची निर्मिती केली. तेव्हापासून बाबांनी आणि गुरुमाईंनी शेकडो ध्यानशिबीरांचे आयोजन केले आणि सहस्त्रावधी लोकांना शक्तिपात दिला आहे.

संपूर्ण जगभरात या वर्षी शक्तिपात ध्यानशिबीराचे आयोजन शनिवार, २७ ऑक्टोबर व रविवार, २८ ऑक्टोबर रोजी होईल. अधिक माहितीसाठी, तसेच स्वामी शांतानंद यांच्यासमवेत असलेल्या प्रश्नोत्तरीसाठी ही पृष्ठे वाचण्याकरिता, मी तुम्हाला आमंत्रित करते.

शक्तिपात ध्यानशिबीरात सहभागी होण्याबरोबरच, तुम्ही बाबांचा महिना सिद्धयोग वेबसाइटच्या माध्यमातूनही साजरा करू शकता. ऑक्टोबर महिन्याच्या मध्यात, वेबसाइटवर कलेकलेने वृद्धिंगत होऊन पूर्णत्वाकडे जाणाऱ्या बाबांच्या चंद्राची वार्षिक छायाचित्रांची गॅलरी दाखवली जाईल; तुम्हीदेखील तुमचे चंद्राचे फोटो या गॅलरीला पाठवून हातभार लावू शकता. बाबांचा ध्यानशिबीराविषयी बोलत असतानाचा एक व्हीडिओ असेल, त्याचबरोबर बाबांच्या शिकवणी, बाबांच्या छायाचित्रांची दर्शन गॅलरी आणि इंद्रियांना अंतर्मुख करण्याविषयीचे एक भाष्यदेखील पोस्ट केले जाईल.

ऑक्टोबर हा नवरात्रीचाही महिना असल्यामुळे म्हणजेच देवी महाकुंडलिनी शक्तीची आराधना आणि तिच्या सन्मानार्थ नऊ रात्रींच्या महोत्सवाचा महिना. ती महाकुंडलिनी शक्ती, जी शक्तिपात दीक्षेच्या माध्यमातून आपल्या अंतरात जागृत होते. म्हणून देवीच्या विविध रूपांपैकी काही स्वरूपांची उपासना करण्यासाठी आपल्याला मदत व्हावी म्हणून वेबसाइटवर शिकवणी, स्तोत्रे आणि नामसंकीर्तने असतील. या वर्षी नवरात्रीचा उत्सव हा ऑक्टोबरच्या ९ ते १७ या तारखांदरम्यान साजरा केला जाईल.

तेव्हा, एकंदरीतच हा एक सर्वात विशेष काळ आहे. जो पावन काळ आहे. ते कालपर्व, जेव्हा कृपेची उपस्थिती स्पष्टपणे जाणवू लागते. ती कृपा, जिची रहस्यमयी व विस्मयकारी शक्ती वास्तव रूपांतरणाला प्रेरित करत असते; आणि जेव्हा आपल्याला वाटू लागते की, स्वतःच्या तसेच आपल्या जगाच्या भल्यासाठी त्या कृपेला प्रकट होऊ देणे हे आपले अत्यावश्यक व प्राथमिक उत्तरदायित्व आहे. ऑक्टोबर महिन्याकडे जाणाऱ्या दिवसांमध्ये आम्हाला श्री मुक्तानंद आश्रमात याविषयी एक मधुर स्मरणसंकेत प्राप्त झाला — कृपा आणि प्रयास आणि त्यांचा एकत्रित प्रभाव. ग्रीष्म ऋतू आमचा निरोप घेत होता; झाडांनी रंग बदलायला सुरुवात केली होती. परंतु तरीही — सूर्यफूलांनी आश्रमातील सर्व बगिच्यांमध्ये आणि मैदानांवर अनपेक्षितपणे उमलायला सुरुवात केली होती! थंड वारे सुरू होण्याच्या बरोब्बर आधी, फक्त काही काळासाठी ती फूले उमलली होती. आणि तीदेखील, बगिच्यात जिथे इतर सूर्यफूले लावली गेली होती त्या जागेपासून दूरवर उमलली होती. जणू काही सूर्यदेव काही वेळापूर्वीच तिथे आजूबाजूला फिरत होते आणि आमची थोडक्यात चुकामुक झाली होती, परंतु जिथे-जिथे त्यांची चरणकमले पडली होती, तिथे ही फूले तेजस्वी, सुगंधी मार्ग तयार करत होती.

नंतर मला समजले की ही आश्चर्यकारक रूपात उगवलेली सूर्यफूले आश्रमाच्या भूमीवर  खारूताईंनी लावली होती. होय — खारूताईंनी. त्यांनी या बिया त्या बगिच्यांमधून गोळा केल्या होत्या जिथे सूर्यफूले लावली गेली होती आणि त्या पात्रांमधून ज्यांमध्ये पक्ष्यांना खाण्यासाठी दाणे ठेवलेले होते. आणि मग, जणू काही बागेचे नवीन कर्तव्यतत्पर सेवाकर्ते असल्याप्रमाणे, त्यांनी त्या बियांना सर्वत्र विखुरले होते — प्रकाश आणि सौहार्दता आणत — आश्रमाच्या भूमीच्या प्रत्येक भागासाठी आणि तेथून चालत जाणाऱ्या सर्व लोकांसाठीही.

आदरपूर्वक,

ईशा सरदेसाई

[1] चर्पटपञ्जरिकास्तोत्रम्, श्लोक १२, स्वाध्याय सुधामधून [हिंदी भाषेत उपलब्ध] [चित्शक्ती पब्लिकेशन्स, २०१६], पृष्ठ, १९५

© २०१८ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.